Civil Application Stamp No. ३२६५६/२०१४ in Writ Petition ३३२० / २००० - संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना लि. , ता. संगमनेर, जिल्हा अहमदनगर विरुध्द महाराष्ट्र शासन. घट उतारा अनुदानाची रक्कम ऊस खरेदी कराच्या रकमेत समायोजित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः ससाका- २०१५/प्र.क्र. २४३/२५ स,
शिबिर कार्यालय, दरबार हॉल, सिताबर्डी, नागपूर - ४४०००१.
दिनांक :१३-१२-२०१७

वाचा :-

१) **शासन निर्णय क्रमांकः सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक:-ससाका-१०९६ /प्र.क्र.१५२/२५ स, दिनांक ३०.९.१९९६**

२) **साखर आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र. सा आ / विकास /१ / या क्र.३३२०-२०००/३६४/२०१७ दि.१८.११.२०१७**

३) **राज्यकर उपायुक्त, (जीएसटी प्रशासन) (AHM-VAT-E-००१), अहमदनगर यांचे पत्र क्र. जा.क्र. / प्रा. शा. / ई ००१/२०१७-१८ /ब- ४२६ अहमदनगर दिनांक ९.११.२०१७ व क्र.४२९ दि.१४.११.२०१७**

शासन निर्णय

सन १९९५-९६ या गळीत हंगामात राज्यामध्ये ऊसाचे विक्रमी पिक झाल्याने कारखान्यांना त्यांच्या गाळप क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेने ऊसाचे गाळप करावे लागले . त्यानुषंगाने दि.१.५.२०१६ नंतर गाळप झालेल्या ऊसाच्या गाळपासाठी एकूण अनुज्ञेय अनुदान रु.२५,५४,४६,०००/- पैकी रु.२,५८,५८,०००/- अनुदान कारखान्यांना प्रत्यक्ष अदा करण्याबाबत आणि उर्वरित रु.२२,९५,८८,०००/- खरेदी कर, भागभांडवल वसुली आणि इतर कर्जाची वसुली या शासकीय वसुलीप्रित्यर्थ पुस्तकी समायोजनेद्वारे समायोजित करण्याचे आदेश वित्त विभागाच्या मान्यतेने शासनाने दि.३०.९.१९९६ रोजी निर्गमित केले. सदर दि.३०.९.१९९६ च्या शासन निर्णयानुसार संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना जि. अहमदनगर यांना सन १९९५-९६ या कालावधीत अतिरिक्त ऊस गाळपासाठी शासनाने रु.४५.५१ लाख मंजूर केले. परंतु सदर कारखान्यास एकूण रु.६७,६८,४१२.०० अनुदान अनुज्ञेय असून उर्वरित रु.२२.१७ लाख फरकाची रक्कम मिळण्याबाबत मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे याचिका क्र.३३२०/२००० दाखल केली व सदर रक्कम सन २०१३-१४ च्या ऊस खरेदी करामध्ये समायोजित करण्याची विनंती केली . त्यानुसार मा. उच्च न्यायालयाने कारखान्यास अनुज्ञेय

रक्कम रु.२२,१७,४१२.२० सन २०१३-१४ च्या ऊस खरेदी करामध्ये समायोजित करण्याचे दि.१९.३.२०१४ रोजी आदेश दिले आहेत. तथापि, सन २०१३-१४ व २०१४-१५ चे ऊस खरेदी कर शासनाने माफ केलेले असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सदर रकमेचे समायोजन करणे शक्य झाले नाही. संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना जि. अहमदनगर कारखान्याने यासंदर्भात मा. उच्च न्यायालयात Civil Application (Stamp No. ३२६५६/२०१४ in Writ Petition ३३२०/२०००) दाखल केली आहे. त्यानुषंगाने प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांनी राज्य कर उपायुक्त (प्रशासन), अहमदनगर यांचे अभिप्राय प्राप्त केले. राज्य कर उपायुक्त, अहमदनगर यांनी सादर केलेल्या माहिती नुसार सदर कारखान्याकडून ऊस खरेदी करापोटी रु.१२१.११ लाख थकबाकी असून दि.१.४.२००७ पूर्वीच्या प्रकरणी मा. न्यायालयात अपील दाखल केले असल्याचे कळविले आहे.

२. मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ , औरंगाबाद न्यायालयाने Writ Petition ३३२०/२००० या प्रकरणी दि.१९.३.२०१४ रोजी दिलेले आदेश, संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना जि. अहमदनगर कारखान्याने यासंदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल केलेले Civil Application (Stamp No.३२६५६/२०१४ in Writ Petition ३३२०/२०००) आणि राज्य कर उपायुक्त (प्रशासन), अहमदनगर यांनी दिलेले अभिप्राय पाहता साखर आयुक्त यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे मागणी क्रमांक व्ही-२, मुख्य लेखाशीर्ष २४२५-सहकार,१०८-इतर सहकारी संस्थांना सहाय्य , (०३) सहकारी साखर कारखाने , (०३)(०२) सहकारी साखर कारखान्याना सहाय्यक अनुदान , (२४२५०९८९) ३१- सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पित तरतूद रु.४०.०० कोटी (रुपये चाळीस कोटी फक्त) निधीमधून संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना जि. अहमदनगर (नवीन नाव - सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना मर्या.) कारखान्यास ऊस घट उतारा अनुदानाच्या फरकाची अनुज्ञेय रक्कम रु. २२,१७,४१२.०० (रुपये बावीस लाख सतरा हजार चारशे बारा फक्त) लेखाशीर्ष ०४० सेल्स टॅक्स (डी) टॅक्स ऑन परचेस ऑफ शुगर केन , उपलेखाशिर्ष ३१६०१ या लेखाशीर्षाखाली पुस्तकी समायोजनाने वसुलीपोटी वळती करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

३. या प्रित्यर्थ होणारा खर्च मागणी क्रमांक व्ही-२, मुख्य लेखाशीर्ष २४२५-सहकार,१०८-इतर सहकारी संस्थांना सहाय्य ,(०३) सहकारी साखर कारखाने , (०३)(०२) सहकारी साखर कारखान्याना सहाय्यक अनुदान , (२४२५०९८९)३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध झालेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागवावा.

४. या प्रकरणी साखर आयुक्त, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून व लेखाधिकारी, साखर आयुक्त कार्यालय, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी रु.२२,१७,४१२.०० (रुपये बावीस लाख सतरा हजार चारशे बारा फक्त) रक्कम पुस्तकी समायोजनाद्वारे

समायोजित करून हि रक्कम "०४० सेल्स टॅक्स (डी) टॅक्स ऑन परचेस ऑफ शुगर केन , उपलेखाशिर्ष ३१६०१" या लेखाशीर्षाखाली जमा दाखवावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५६०/२०१७ / व्यय-२, दि.५.१२.२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२१३१६५०१८२५०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deepak S Desai

Digitally signed by Deepak S Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMT Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d11b2ee4dfa01facc6e58028a3bde93d4ac81d87ed6247ca0fb3a827602426f, cn=Deepak S Desai
Date: 2017.12.13 16:54:06 +05'30'

(दि.शि.देसाई)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२. मा. अपर मुख्य सचिव (सहकार),सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग , मंत्रालय ,मुंबई
३. साखर आयुक्त, साखर संकुल , पुणे,
४. सहकार आयुक्त, व निबंधक सहकारी संस्था, पुणे
५. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, मुंबई, नागपूर,
६. सरकारी वकिल, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद
७. प्रादेशिक सह संचालक (साखर) अहमदनगर
८. राज्यकर उपयुक्त (जीएस टी प्रशासन) (AHM-VAT-E-००१), यांचे कार्यालय, स्टेट बँकेजवळ , जीपीओ चौक , अहमदनगर
९. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर
१०. वित्त विभाग, व्यय-२/ कराधान-३/ अर्थसंकल्प-३/ अर्थसंकल्प-१२,
११. अवर सचिव (अर्थसंकल्प), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई,
१२. कक्ष अधिकारी , कार्यासन ३-स , सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड संग्रह (२५-स)सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.